<u>सरकार तर्फे साक्षीदार क्र. १७</u>

<u>नि.फौ.ख.क्र.१२७/२०१६</u>
सरकार विरूध्द सुरेश
निशाणी – १११

मी शपथपूर्वक खरे सांगतो की

माझे नाव – रूबीना ईस्तीयाख शेख
वय – अंदाजे ४८ वर्ष, व्यवसाय – गृहिणी
राहणार – नया बाजार, कामठी.

**सरतपास सरकार पक्षातर्फे सहाय्यक सरकारी अभियोक्ताश्रीमती जी. ओ. वर्मा यांच्या कडून**

मी आरोपी सुरेश बोरकर यांना ओळखते. मी कामठी नगर परिषदेची अध्यक्ष असताना ते कामठी नगर परिषदेत इंजिनिअर म्हणून काम करत होते. ते कोणत्या शाखेचे इंजिनिअर होते हे मला माहिती होते. साक्षीदार सांगते की ते बांधकाम विभागाचे इंजिनिअर होते. मी आरोपी प्रियंका ठाकरे, जयप्रकाश यादव, देविदास सर्वे, शिवदास प्रधान यांना ओळखत नाही. मी ७ डिसेंबर २०१२ पासून ७ ऑगस्ट २०१४ पर्यंत नगर परिषदेची अध्यक्ष होते.

२. अध्यक्ष म्हणून मी सभेला मंजूरी देत होते व जन प्रतिनिधींच्या समस्या व डेप्यूटेशन याची कामे करत होती. २०१४ साली दलित वस्तीसुधार योजनेसाठी १२ करोड रूपयाची कामे आली होती. त्यासाठी सभा आयोजित केली होती व त्यामध्ये काम मंजूरीचा प्रस्ताव मांडला गेला होता. मंजूरीसाठी ईस्टीमेट तयार करायचे काम जे. पी. यादव यांना दिले होते. हॉकी बिल्डींग पासून आसाराम कांबळे यांच्या घरापर्यंत रस्ता बांधण्याचा प्रस्ताव होता. जे. पी. यादव यांचे केवळ अंदाज पत्रक बनविण्याचे काम होते. त्याशिवाय ईतर काम बोरकर करत होते. बोरकर हे कामाची देखरेख तसेच कामाची बिले व त्याची रक्कम देण्याचे काम करत होते. अंदाज पत्रक बनविल्यानंतर ते काम बोरकर यांच्याकडे जाते. तेथून मुख्याधिकारी यांच्याकडे जाते. त्याचे ऑडिट झाल्यानंतर मुख्याधिकारी कामावर सही करतात. त्यानंतर कनिष्ठ अभियंता व मुख्याधिकारी यांची मंजूरी झाल्यानंतर माझ्याकडे मंजूरीसाठी काम येत होते. या कामासाठी माझ्याकडे दोन प्रस्ताव मंजूरीकरीता आले होते. या कामाचे बोरकर यांनी रू.१२,७४,०००/– ईतक्या रकमेचे बिल बनविले होते. बोरकर यांनी १२ लाखाचे बिल दि. १३.०५.२०१४ रोजी दाखल केले होते व दुसरे बिल ५,८६,०००/– चे बिल दि.०५.०८.२०१४ रोजी दाखल केले होते.माझ्याकडे आलेल्या फाईलवर कनिष्ठ अभियंता व मुख्याधिकारी यांची मंजूरी असल्याने मी मंजूरी दिली होती. बोरकर हे तांत्रिक तज्ञ होते. मी सभेमध्ये आलेल्या या प्रकरणाच्या संदर्भातील विषयाला मंजूरी दिली होती व त्यावर असलेल्या नोटशीटवर मंजूरी दिली होती.

३. मला आता पान नं.१५८ कडील दि.२०.०९.२०१२ रोजीचा दस्त दाखविला. सदरचा दस्त हा त्यादिवशीच्या सभेचे ईतीवृत्त आहे. या ईतीवृत्तानूसार रस्त्याचे काम श्री साई कंस्ट्रक्शन यांना देण्यात आले होते. या ईतीवृत्तावर माझी सही आहे. सदरच्या ईतीवृत्तावर खरी प्रत म्हणून कोणाची सही आहे हे मी सांगू शकत नाही. सदरचे ईतीवृत्ताची खरी प्रत असल्याने त्यास **<u>आर्टिकल– अ.१</u>** देण्यात येते.

**(या प्रकरणातील निशाणी १ वरील आदेशानूसारसहाय्यक अधिक्षक कामठी यांच्या ताब्यात ठेवलेले मुळ कागदपत्र मागविण्यात आले. त्यातील कागदपत्र साक्षीदाराला दाखविले. )**

४. मला आता पान नं.१४४ कडील दि.२५.०७.२०१४ रोजीची नोटशीटची मुळ प्रत दाखविण्यात आली. सदरची नोटशीट माझ्याकडे आली होती. त्यावर मागच्या पानावर माझी सही आहे. मी नोटशीटमध्ये कनिष्ट अभियंता व मुख्याधिकारी यांचया अहवालानूसार व मंजूरीनूसार मान्यता देण्यात आली असा मजकूर लिहीला आहे. मला आता पान नं.१४४ कडील दि.०४.०८.२०१४ रोजीची नोटशीटची मुळ प्रत दाखविण्यात आली. सदरची नोटशीट माझ्याकडे आली होती. त्यावर मागच्या पानावर माझी सही आहे. मी नोटशीटमध्ये कनिष्ट अभियंता व मुख्याधिकारी यांचया अहवालानूसार व मंजूरीनूसार मान्यता देण्यात आली असा मजकूर लिहीला आहे. त्यातील मजकूर बरोबर आहे. या दोन्ही नोटशीटला **निशाणी ११२ व ११३** देण्यात येते.

५. मला आता दोषारोप पत्रातील पान नं. १२२ कडील दस्त दाखविला. सदरचा दस्त दि.०२.०१.२०१४ रोजीचा आहे. सदरचा दस्त जे.पी. यादव यांना अंदाजपत्रक तयार करण्यासाठी देण्याच्या बिलाचा आहे. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर बरोबर आहे. त्यास **आर्टिकल–अ.२** देण्यात येते.

६. मला आता दोषारोप पत्रातील पान नं. १२८ कडील दस्त दाखविला. सदरचा दस्त हा श्री साई कंस्ट्रक्शन यांना दिलेल्या बिलाचा दस्त आहे. त्यावर माझी सही आहे, त्यातील मजकूर बरोबर आहे. त्यास **आर्टिकल – अ.३** देण्यात येते. बिले देते वेळी कनिष्ठ अभियंता बोरकर यांनी दिलेल्या ज्या दस्तांची आवश्यकता असते ते दस्त देण्यात आले होते, त्यामध्ये एम.बी. व अंदाजपत्रक होते. पोलिसांनी माझ्याकडे विचारपूस केली होती.

७. मला त्यानंतर पोलिसांकडून असे समजले की बोरकर यांनी एकाच कामाचे दोन वेळा बिले काढले आहे. बोरकर यांनी रू.१२,७४,०००/– व रू.५,८६,०००/– अशी रक्कम काढली होती.

**सरतपास संपला.**

**उलटतपास आरोपी क्र.१, २, ४ व ५ तर्फे वकील श्री. अढाउ यांचा पुकारा केला असता गैरहजर. आरोपी क्र.१, ४ गैरहजर. सबब आरोपी क्र.१ व ४ तर्फे उलटतपास नाही. आरोपी क्र.२ प्रियंका ठाकरे हजर, त्यांनी उलटतपास घेण्यास नकार दिला.**

**आरोपी क्र.५ शिवदास यांनी साक्षीदाराला प्रश्न विचारणे असल्याचे सांगितले.**

८. मला दुस–यांदा झालेल्या कामाची माहिती नव्हती.

**उलटतपास आरोपीक्र. ५ तर्फे संपला.**

**आरोपी क्र.३ तर्फे वकील श्री. कांबळे यांच्या मार्फत सुरू**

९.		मी कॉमर्स पदवीच्या शाखेतून पदवीचे शिक्षण घेतले आहे. हे म्हणणे खरे  आहे की मी सांगितलेली रक्कम माझा बयान वाचून सांगितली आहे. मी साक्षी पिंज–यात येण्यापूर्वी माझा बयान वाचला होता. हे म्हणणे खरे  आहे की सरकारी वकीलांच्या रूममध्ये मी बयान वाचला. (सरकारी वकीलांनी या प्रश्नाला हरकत घेतली व साक्षीदाराला केसबाबत उजाळा देण्याची तरतूद असल्याचे नमूद केले. सदरच्या प्रश्नाची हरकत युक्तीवादाच्या वेळी निर्णय देण्यात येईल.) हे म्हणणे खरे  आहे की नगर पालिकेचे सदस्य त्यांच्या विभागात जे काम करायला लावतात ती कामे केली जातात. एखादे काम पूर्ण झाल्यानंतर त्यामध्ये ते काम पुढे वाढवण्याबाबत सदस्याने विनंती केल्यास तसे काम पुढे वाढविले जाते का याची मला माहिती नाही. नगर परिषदेतर्फे करण्यात येणारी कामे सदस्यांच्या सल्ल्यानूसार व मागणी नूसार केली जात नसून त्यांनी लेखी दिल्यानंतर ते पत्र किंवा अर्ज सभेसमोर ठेवून त्यास मंजूरी मिळाल्यानंतर ती कामे केली जातात. आम्ही केलेल्या कामाबाबत कोणत्या कोण्त्या सदस्यांनी अर्ज दाखल केला होता हे मला आठवत नाही. सभासदांनी काम करण्याबाबात दिलेल्या अर्जाच्या प्रती पोलिसांना दिल्या नाही. हे म्हणणे खरे  नाही की सभासंदांनी तोंडी सांगितल्यानूसार मी कामाचे वाटप केले होते. हे म्हणणे खरे  नाही की सभासंदांनी दिलेल्या अर्जानूसार कामाचे वाटप केले हे मी खोटे सांगतो. माझ्याकडे मी  अध्यक्ष असताना नगर परिषदेचा कारकून किंवा पीए नव्हता. हे म्हणणे खरे आहे की नगर परिषदेचे लिपीक माझ्यासमोर प्रकरण ठेवत होते.

**उलटतपास मध्यंतरामूळे तहकूब**

वा.दा.ब.अ.क.के.
समक्ष

MOHAN RAMCHANDRA KAMAT
Digitally signed by MOHAN RAMCHANDRA KAMAT
Date: 2025.12.09 15:41:55 +0530

कामठी
दिनांक ०८/१२/२०२५

(मोहन रा. कामत)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
न्या.क्र. १, कामठी

**<u>सरकार तर्फे साक्षीदार क्र. १७</u>**

**<u>नि.फौ.ख.क्र.१२७/२०१६</u>**
**सरकार विरूध्द सुरेश**

**मी शपथपूर्वक खरे सांगतो की**

**निशाणी – १११**

**मध्यंतरानंतर आरोपी क्र.३ तर्फे वकील श्री. कांबळे यांच्या मार्फत सुरू**

१०. हे म्हणणे खरे आहे की ईस्टीमेट दिल्यानंतर ते मंजूर करायचे की नामंजूर हे नगर पालिका ठरवते. ईस्टीमेट मंजूर किंवा नामंजूर करण्यासाठी कोणते अधिकारी किंवा लोकप्रतिनीधी काम करतात याची मला माहिती नाही. नगर परिषदेला आलेल्या रकमेचे लेखापरिक्षण होते. हे म्हणणे खरे आहे की त्या रकमेने कोणती कामे झाली त्या कामाचेही लेखापरिक्षण होते. मी जोपर्यंत कार्यरत होते तोपर्यंत कामामध्ये घोळ झाल्याचे दिसून आलेले नाही. हे म्हणणे खरे आहे की नगर परिषदेच्या प्रत्येक प्रभागामध्ये बरोबर काम झाले.

**आरोपी क्र.३ तर्फे वकील श्री. कांबळे यांच्यातर्फे उलटतपास संपला.**

**फेरतपास नाही.**

वा.दा.ब.अ.क.के.
समक्ष

MOHAN RAMCHANDRA KAMAT
Digitally signed by MOHAN RAMCHANDRA KAMAT
Date: 2025.12.09 15:42:02 +0530

कामठी
दिनांक ०८/१२/२०२५

(मोहन रा. कामत)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
न्या.क्र. १, कामठी